एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत
अंगणवाडी कर्मचा-यांना एल.आय.सी योजनेंतर्गत
सेवानिवृत्तीनंतर एकरक्कमी लाभ देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र.एबाबि-२०१३/प्र.क्र.१४१/का.६
नवीन प्रशासन भवन,३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक :- ३० एप्रिल, २०१४

**वाचा :-** १) महिला व बाल विकास शासन निर्णय क्र. एबावि-२००७/प्र.क्र.१९१/का-६, दिनांक २१.८.२००८
२) आयुक्त,महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. मबाविं/एबाविं/का-७/२०१२-१३ ८६९, दि.१८ मार्च २०१३ चे पत्र.

**प्रस्तावना :-** महिला व बाल विकास शासन निर्णय क्र. एबावि-२००७/प्र.क्र.१९१/का-६.दिनांक २१.८.२००८ अधिक्रमित करुन एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका या मानधनी कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती / राजीनामा/ मृत्यू /सेवेतून काढून टाकल्यानंतर एल.आय.सी योजनेंतर्गत एक रक्कमी लाभ देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-** महिला व बाल विकास शासन निर्णय क्र. एबावि-२००७/प्र.क्र.१९१/का-६. दिनांक २१.८.२००८ अधिक्रमित करण्यात येत आहे. त्यामुळे **अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका या मानधनी** कर्मचा-यांना सेवानिवृत्ती / राजीनामा / मृत्यू / सेवेतून काढून टाकल्यानंतर खालील प्रमाणे एल.आय.सी. योजनेअंतर्गत एकरकमी लाभ दिनांक ३०.०४.२०१४ पासून देण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| **लाभस्तर** | **अंगणवाडी सेविका** | **मिनी अंगणवाडी सेविका / मदतनीस** |
|---|---|---|
| सेवानिवृत्ती | रु.१,००,०००/- | रु.७५,०००/- |
| राजीनामा / सेवेतून काढून टाकणे | प्रत्येक पुर्ण सेवा केलेल्या एका वर्षासाठी महिन्याचे वेतन. (जास्तीत जास्त १,००,०००/- मर्यादेपर्यंत) तथापि कमीत कमी पाच वर्षाची सेवा पुर्ण करणे आवश्यक | प्रत्येक पुर्ण सेवा केलेल्या एका वर्षासाठी महिन्याचे वेतन. (जास्तीत जास्त ७५,०००/- मर्यादेपर्यंत) तथापि कमीत कमी पाच वर्षाची सेवा पुर्ण करणे आवश्यक |
| मृत्यू | रु.१,००,०००/- | रु.७५,०००/- |
| प्रत्येक सदस्याचे योगदान | रु.२००/- प्रतिमाह | रु.१००/- प्रतिमाह |
| सुरुवातीचे शासनाचे योगदान | रु.१७.५ कोटी | रु.३१.५ कोटी |

२. सदर योजना सुरु करण्यासाठी सुरुवातीचे योगदान रु.४९.०० कोटी इतक्या रक्कमेचा धनादेश आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे कार्यालयाने एल.आय.सी. ला देण्यात यावा. [illegible]

कार्यरत असलेल्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांची संख्या विचारात घेवून तेवढया अंगणवाडी कर्मचाऱ्यांची योगदानाची रक्कम आयुक्तालय स्तरावरुन एकाच धनादेशाद्वारे एल.आय.सी., पुणे यांना प्रत्येक महिन्याला देण्यात यावी.

३. सदर योजना सुरु झाल्यानंतर जी अंगणवाडी कर्मचारी सेवानिवृत्त / राजीनामा / मृत्यू / सेवेतून काढून टाकल्यानंतर अथवा मुख्यसेविका / पर्यवेक्षिका म्हणून निवड होईपर्यंत त्यांना या योजनेअंतर्गत एकूण मानधन पदावरील सेवा लक्षात घेऊन देण्यात येणारे लाभ बाबतचे दावे बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) / संबंधित जिल्हयाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बाल कल्याण यांनी एल.आय.सी. पुणे यांचेकडे दाखल करावे.

४. याप्रकरणी येणारा खर्च मागणी क्रमांक एक्स-१, २२३६-पोषण आहार, ०२-पोषक अन्न व पेये वितरण, १०१-विशेष पोषण आहार कार्यक्रम, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना (ग्रामीण १०० टक्के) (०५) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (०५) (०२) एकात्मिक बाल विकास सेवा योजना- (२२३६ ००६३) (राज्य आरोग्य व पोषण आहार निधीतून भागविलेली रक्कम) ०२ मजुरी व मागणी क्रमांक एक्स-१, २२३६-पोषण आहार, ०२-पोषक अन्न व पेये वितरण, १०१-विशेष पोषण आहार कार्यक्रम, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना- (०१) (०४) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (२२३६ ०५४६) (राज्य आरोग्य व पोषण आहार निधीतून भागविलेली रक्कम) ०२ मजुरी या लेखाशिर्षाखाली सन २०१४-१५ या वित्तीय वर्षात तरतूद मंजूर केल्यानंतर भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.३२९/१४, दिनांक २९.०४.२०१४ अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(उज्वल ऊके)
**प्रधान सचिव**

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री / राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
सर्व मंत्रालयीन विभाग.

सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास विभाग
सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई
सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (बाल कल्याण),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त व नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
महिला व बाल विकास विभागातील उप सचिव,